cmyk

# टक्केवारीसाठी गुत्तेदारांना पोसणाऱ्या प्रकाशाला जनतेची काय क्यू येणार? रस्त्यांवर पडलेल्या मुड्याला लोकप्रतिनिधीच जबाबदार?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564


## सत्तेच्या मोहात असलेल्या प्रकाशामुळे सर्वसामान्य नागरिकांचा बळी, ज्याचं जळतं त्यालाच कळतं दादाला काय कुसळ कळणार का?


■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २५४ ■ सोमवार दि.२ जून २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 254 ■ Monday Dt.2 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


## माजलगाव - तेलगाव रस्त्यावर एकाच दिवसात पाच जणांचा बळी गेला या अपघाताला कारणीभूत रस्त्याच्या मधोमध पडलेल्या भेगा आणि रस्त्यावरील खड्डे?

# आ.प्रकाश दादा डोकं भानावर ठेवून रस्ता दुरुस्तीचे काम तात्काळ करा आणि गुत्तेदारांना पोसण्याचं बंद करा?

## माजलगावचा लोकप्रतिनिधी म्हणून वावरणाऱ्या दादाला रस्त्यावर खड्डे पडलेले दिसत नाहीत का? मधोमध पडलेल्या रस्त्यांवर भेगा आमदारांकडून विकास कामाला ठेंगा; आमदार महोदय जनाची नाही तर मनाची तरी बाळगा?

बीड । प्रतिनिधी

मेहकर-पंढरपूर या पालखी महामार्गावरील तेलगाव-माजलगाव रस्त्यावर रविवारी एकाच दिवशी अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला आहे. पहिला अपघात ट्रकचा आणि दुचाकीच्या अपघातात एक जण जागीच ठार झाला आहे. तसेच त्यानंतर रात्री ११ वाजेदरम्यान दुसरा अपघात होऊन त्यात चार जण ठार तर काही गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. जखमींना माजलगाव येथील रूग्णालयात उपचारार्थ पाठविण्यात आले होते. मयतांमध्ये पती-पत्नीचा समावेश आहे. हा अपघात एवढा भीषण होता की, आयशरने ऑटोला जवळपास ५० ते ६० फूट अंतरापर्यंत फरफटत नेले. घटनास्थळी दिंद्रुड पोलीस तात्काळ दाखल झाले. या महामार्गावर एकाच दिवसात पाच जणांचा बळी गेला आहे. या अपघाताला कारणीभूत रस्त्याच्या मधोमध पडलेल्या भेगा आणि त्यावरील खड्डे आहेत. आमदार प्रकाश सोळुंके यांच्या दुर्लक्षामुळे हे अपघात घडून येत असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे. सत्तेचा प्रकाश असतानाही या रस्त्यावरील खड्डे दिसत नसल्याने अपघातांची मालिका सुरू आहे. सतत बळी जात असून आमदार प्रकाश सोळंके यांना हे दिसत नाही का? ते इतके शांत कसे बसू शकतात असा प्रश्न मतदारसंघातील जनतेला पडलेला आहे. टक्केवारीसाठी गुत्तेदारांना पोचणाऱ्या आमदार प्रकाश दादा सोळंके यांना जनतेची काय क्यू येणार, आमदार म्हणून प्रकाश दादाला रस्त्यावर खड्डे पडलेले दिसत नाहीत का? रस्त्याच्या मधोमध पडलेल्या भेगा आणि आमदाराकडून विकासा कामाला ठेंगा अशा उलट सुलट चर्चा सध्या ऐकायला मिळत आहे.

यासंदर्भात समजलेली माहिती अशी की, माजलगाव तालुक्यातील भाटवडगाव येथील कांही लोक ऑटो क्र. एमएच २३ एन ०२७३ ने रविवारी अकरा ते साडे अकरा वाजेदरम्यान तेलगावकडून माजलगावकडे जात असताना सदरील ऑटो नित्रुड जवळील एका पेट्रोल पंपासमोर आला असता. समोरून येणाऱ्या आयशर क्र एमएच २३ एम ९२५५ ने ऑटोला जबरदस्त धडक दिली. आयशरने धडक देताच ऑटो जवळपास ५० ते ६० फूट दूर अंतरापर्यंत फरफटत नेले. या भीषण अपघातात ऑटोमधील तीन जण जागीच ठार झाले असून, मयतात एका महिलेचा समावेश आहे. याशिवाय आणखी एकाचाही मृत्यू

पान २ वर



### रविवार ठरला अपघातवार!

मेहकर-पंढरपूर पालखी महामार्गावरील माजलगाव ते तेलगाव हा रस्ता रविवारी अपघात वार ठरला. दुपारी दोन वाजे दरम्यान महारुद्र लोंढे या दुचाकी स्वराचा ट्रक अपघातात जागीच मृत्यू झाला होता. रात्री साडेअकरा दरम्यान याच रस्त्यावर ऑटो व आयशरच्या धडकेत तीन व्यक्ती ठार झाल्याने रविवारी पालखी महामार्ग साठी हा रस्ता अपघात वार ठरल्याचे दिसून आले.

## अवकाळी पावसाने कांद्याचे नुकसान शेतकऱ्याने संपवले जीवन

आष्टी । प्रतिनिधी



मान्सूनपूर्व अवकाळीने पावसाने जोरदार हजेरी लावल्याने विक्रीसाठी आलेल्य कांद्याचे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले. यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्याने शेतातच गळफास घेऊन जीवन संपविल्याची घटना निंबोडी येथे रविवार (दि. १) सायंकाळी घडली. गोविंद रंगनाथ आंधळे (४२) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.

आष्टी तालुक्यातील लिंबोडी येथील शेतकरी गोविंद रंगनाथ आंधळे वय ४२ वर्ष यांनी आपल्या दोन एकर शेतात कांद्याची लागवड केली होती. मान्सूनपूर्व अवकाळी पावसामूळे हाताशी आलेला कांदा वाहून गेला. एकीकडे नुकसान तर दुसरीकडे आर्थिक संकट ओढवल्याने डोक्यावरचे उसनवारी कर्ज कसे फेडायचे या विवंचनेत आंधळे होते. यातूनच शेतकऱ्यांनी रविवार (दि.१) रोजी सायंकाळच्या सुमारास शेतातच गळफास घेऊन आत्महत्या केली.

## बीड तालुक्यातील ओमकार सहा दिवसांपासून बेपत्ता

बीड । प्रतिनिधी

पिंपळनेर पोलिस ठाणे हद्दीतील जुजगव्हाण गावातील रहिवाशी असलेला ओमकार सुधाकर कांबळे वय १४ वर्ष. हा मुलगा दि. २४ रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास ढेकनमोहा ता. जि. बीड ईथुन बेपत्ता झालेला आहे तो अद्याप मिळून आलेला नाही. ओमकार बेपत्ता असल्याची तक्रार त्याचे वडील सुधाकर कांबळे यांनी दिलेली आहे मात्र पिंपळनेर पोलिसांनी आजपर्यंत कुठलीच हालचाल केलेली नाही.

पिंपळनेर ठाण्याच्या प्रभारी पवार मॅडम यांना संपर्क केला असता त्यांनी उत्तर दिले नाही. ठाण्यात विचारले असता शोध सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

इकडे मात्र ओमकार च्या आई वडिलांचे रडून रडून बेहाल आहेत. गेली सहा दिवस झाले आहेत मुलाचा पत्ता लागत नसल्याने आईवडील बेचैन आहेत. अन्न पाणी सोडून ते लेकरांच्या शोधत आहेत दुसरीकडे पोलिस कोणत्याही प्रकारची हालचाल करत नाहीत त्यामुळे पोलिसांच्या कालगिरीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. दरम्यान ओमकार च्या वडिलांनी मुलाचा योग्य पत्ता सांगेल त्याला योग्य बक्षीस दिले जाईल अशी घोषणा केली आहे व संपर्क देखील दिला ओमकार कुठे दिसल्यास या ९०४९९०६८११ क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

## बीड पोलिस दलात मोठे बदल; १७ अधिकाऱ्यांच्या केल्या बदल्या

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात सर्वाधिक चर्चेत असलेल्या जिल्हा पोलिस दलात शनिवारी (ता. ३१) मोठे फेरबदल करण्यात आले. जिल्हा पोलिस दलातील तीन पोलिस निरीक्षक, नऊ सहाय्यक पोलिस निरीक्षक व पाच पोलिस उपनिरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या. तसेच, बाहेर जिल्ह्यातून आलेल्या दोन निरीक्षकांनाही पोलिस ठाण्यांची जबाबदारी देण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षकांची नेमणूकही शनिवारी पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी केली. शिवाजी बंटेवाड यांना ही जबाबदारी देण्यात आली.

शिवाजी बंटेवाड हे बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात कार्यरत होते. ११ महिन्यांपूर्वी परळीहून उस्मान शेख यांची स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक म्हणून नेमणूक झाली. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर त्यांच्यावर आरोप झाल्यानंतर त्यांनी विनंती बदलीची मागणी केली होती. त्यांची सरत्या आठवड्यात लातूरला बदली झाली.

पोलिस निरीक्षक संवर्गामध्ये शिवाजी नगर ठाण्याचे मारुती खेडकर यांची बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात तर त्यांच्या जागी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातून आलेले किशोरसिंग पवार यांना जबाबदारी देण्यात आली. अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्याचे विनोद घोळवे यांची सायबर पोलिस ठाण्यात बदली झाली. तर, त्यांच्या जागी संभाजीनगरहून आलेले शरद जोगदंड यांना नेमणूक देण्यात आली.

अनैतिक मानवी प्रतिबंधक पथकाच्या प्रमुख सहाय्यक पोलिस निरीक्षक वर्षा व्होगाडे यांना वडवणी पोलिस ठाण्याची जबाबदारी देण्यात आली. याच संवर्गातील गणेश धोक्रट यांची शिरुर कासारहून जिल्हा विशेष शाखेत बदली करण्यात आली.

राजेंद्र घुगे यांची अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यातून अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात तर गेवराईहून संतोष जंजाळ यांची पाटोदा पोलिस ठाण्यात आणि आर्थिक गुन्हे शाखेतील रत्नाकर घोळवे यांची एटीबीला बदली करण्यात आली. आरसीपीला असलेले महादेव ढाकणे यांना दिंद्रूड तर अंबाजोगाई शहरला असलेले मनोज निलंगेकर यांना तलवाडा आणि परळीच्या संभाजीनगर पोलिस ठाण्यातील प्रविण जाधव यांना शिरुर कासार पोलिस ठाण्याची जबाबदारी देण्यात आली.

परळी ग्रामीण पोलिस ठाण्यातील अनमोल केदार यांची पोलिस अधीक्षकांचे वाचक म्हणून बदली करण्यात आली. पोलिस उपनिरीक्षक संवर्गातील भारत बर्डे यांची आर्थिक गुन्हे शाखेतून युसूफवडगाव पोलिस ठाण्यात तर शफिक सय्यद यांची पोलिस अधीक्षकांच्या वाचक शाखेतून बीड उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांचे वाचक पदावर बदली करण्यात आली. डिएसबीमधील दादासाहेब केदार यांना कायम ठेवले असून आनंद शिंदे यांची केजहून अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात बदली करण्यात आली. पोलिस उपनिरीक्षक अदिनाथ भडके यांची पाटोदाहून अंभोरा पोलिस ठाण्यात बदली करण्यात आली.

## आयपीएस विश्वास नांगरे पाटील यांचे नाव घेत भामट्यांनी केली फसवणूक

### अंबाजोगाईतील सेवानिवृत्त शिक्षिकेला 'डिजिटल अरेस्ट' करून सायबर भामट्यांनी लुटले तब्बल ८३ लाख रुपये

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मी महाराष्ट्र पोलिस बोलत असून तुमच्या नावाने मनी लॉन्ड्रींग आणि अतिरेक्यांना फंडींग झाल्याची माहिती आहे. त्यामुळे आम्हाला सहकार्य करा असे म्हणत व्हाट्सअपला व्हिडीओ कॉल करून निवृत्त शिक्षिकेला डीजिटल अरेस्ट केली. त्यानंतर २१ ते २९ मे या दरम्यान तब्बल ८३ लाख रूपये ऑनलाईन हडप केले. याप्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.


सावित्री (नाव बदलले आहे, वय ६५ रा. अंबाजोगाई जि.बीड) या निवृत्त शिक्षिका आहेत. २० मे रोजी त्यांच्या ना एका अनोळखी क्रमांकावरून कॉल आला. मी महाराष्ट्र पोलीस संजय पिसे बोलतो असे त्याने सांगितले. नंतर हिंदी भाषेत तो म्हणाला की तुमच्या आधारकार्डवरुन दुसरे सिमकार्ड १६ एप्रिल रोजी घेतले गेले आहे. या सीमकार्डच्या माध्यमातून तुमच्या नावाने मनी लॉन्ड्रीग व अतिरेक्यांना फंडींग झाली आहे. तुम्ही तीन दिवसात सर्व सहकार्य करा आणि आम्ही तुम्हाला यातुन सोडवु. यासाठी आम्ही

पान २ वर

cmyk

# लोकनेते मुंडे साहेबांच्या अभिवादनासाठी आज गोपीनाथगडावर उसळणार अलोट गर्दी

## रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी, पशूसंवर्धन कॅम्प, वृक्ष रोपांचे वाटप यासह विविध उपक्रमांचे आयोजन



परळी वैजनाथ । प्रतिनिधी
आपल्या लाडक्या लोकनेत्यास अभिवादन करण्यासाठी उद्या ३ जून रोजी गोपीनाथ गडावर राज्यभरातील कार्यकर्त्यांची मोठी गर्दी उसळणार आहे.गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या स्मृती दिनानिमित्त ३ जून रोजी विविध लोकोपयोगी उपक्रम राबवण्यात येत असून ह.भ.प. रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचे सुश्राव्य कीर्तनाचा सर्वांनी मोठया संख्येने लाभ घ्यावा असं आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे. गोपीनाथगड येथे स्मृतीदिनाची जय्यत तयारी झाली आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यावर अफाट प्रेम करणारे राज्यभरातील असंख्य मुंडेप्रेमी यादिवशी गोपीनाथगड येथे नतमस्तक होऊन आपल्या लाडक्या नेत्याला अभिवादन करणार आहेत. राज्याच्या पर्यावरण आणि पशूसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांच्यासह मुंडे कुटुंबीय आणि राज्यभरातून असंख्य मान्यवर स्मृती दिनानिमित्त गोपीनाथगड येथे उपस्थित राहणार आहेत.
यावेळी गडावर रक्तदान शिबीर, वाहन चालकांची आरोग्य तपासणी, पशूसंवर्धन कॅम्प, जनावरांना औषधांचे वाटप, पर्यावरण संवर्धनासाठी विविध वृक्षांच्या रोपांचे वाटप असे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

**ढोक महाराजांचे सुश्राव्य कीर्तन**



सामाजिक उपक्रमा बरोबरच उद्या दुपारी १२ ते २ वा. यावेळेत प्रसिद्ध कीर्तनकार रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक यांचे सुश्राव्य कीर्तन आणि त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गडावर येणाऱ्या मुंडे भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची आणि महाप्रसादाची व्यवस्था देखील करण्यात आली आहे.

# एसएफआयच्या १९व्या महाराष्ट्र राज्य अधिवेशनास आजपासून

## नांदगाव खंडेश्वर येथे सुरुवात

बीड । प्रतिनिधी
स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय)चे १९वे तीन दिवसीय महाराष्ट्र राज्य अधिवेशन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगे महाराज यांची जन्म व कर्मभूमी असलेल्या नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथे संपन्न होणार आहे. या अधिवेशनाच्या निमित्ताने आज, २ जून २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.
या सभेसाठी एसएफआयचे अखिल भारतीय अध्यक्ष व्ही. पी. सानू, महासचिव मयुख बिस्वास, डहाणू विधानसभेचे आमदार कॉ. विनोद निकोले, शेतकरी नेते डॉ. अजित नवले, एसएफआयचे राज्य अध्यक्ष सोमनाथ निर्मळ आणि सचिव रोहिदास जाधव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. बीड जिल्ह्यातून मोठ्या संख्येने विद्यार्थी या अधिवेशनात सहभागी होत आहेत. या जाहीर सभेसाठी विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन एसएफआयच्या वतीने करण्यात आले आहे.
एसएफआय ही देशातील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना आहे. स्थापनेपासूनच एसएफआयने शिक्षणातील विविध प्रश्नांवर देशभरात आंदोलनांची लढाई उभी केली आहे. सर्वांना समान, मोफत, दर्जेदार आणि रोजगाराभिमुख शिक्षण मिळावे, तसेच विद्यार्थी वर्गाचे हक्क व अधिकार सुरक्षित राहावेत, यासाठी एसएफआयने कायमच संघर्ष केला आहे.
सरकारी शाळा बंद करण्याचे धोरण रद्द करणे, नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण रद्द करणे, शैक्षणिक संस्थांमधील लोकशाही बळकट करणे,शिक्षण, रोजगार आणि विकास यांच्यातील समन्वय साधणारे धोरण राबवणे, त्रिभाषा सूत्र आणि हिंदी सक्तीविरोधातील भूमिका या व अन्य विद्यार्थी प्रश्नांवर आगामी काळातील संघटनेची नियोजन करण्यात येणार आहे.
या अधिवेशनात वरील शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक मुद्द्यांवर सखोल चर्चा व विचारमंथन करण्यात येणार आहे. अधिवेशनात आगामी काळातील कामाचा आराखडा निश्चित केला जाईल आणि काही महत्त्वाचे ठराव मांडले जातील. राज्यभरातून ३०० हून अधिक विद्यार्थी प्रतिनिधी या अधिवेशनात सहभागी होत आहेत. बीड जिल्ह्यातूनही विद्यार्थी प्रतिनिधींचा उत्स्फूर्त सहभाग असल्याची माहिती एसएफआयचे राज्य सहसचिव लहू खारगे, राज्य सचिवमंडळ सदस्य संतोष जाधव, राज्य उपाध्यक्ष व जिल्हाध्यक्ष सत्यजित मस्के, जिल्हा सचिव पवन चिंचाने यांनी दिली आहे.

# शेती, माती व पाण्यांचे संवर्धन अहील्याबाई होळकर यांनी केले : मनिषा तोकले



बीड । प्रतिनिधी
शेती करणाऱ्या महीलांनी अहिल्याबाई होळकर यांचा आदर्श घ्यावा. अहील्याबाई होळकर यांनी त्यांच्या राज्यकारभारातील बहुतेक वेळ व पैसा लोकांची शेती माती व पाणी संरक्षित करून त्यांचे सवंर्धन करण्यासाठी खर्च केला आहे. रस्त्यावर प्रवास करणारांची तहान भागवण्यासाठी अनेक ठिकाणी विहीरीत खोदल्या. देशातील नद्यांवर संरक्षक कवच बांधले. नदीला पुर आल्यानंतर लोकांना आपली वाहतूक करता येत नव्हती म्हणून नदीवर पुल बांधले. ज्या ठिकाणी नदीवर पुल बांधणे शक्य नाही त्या ठिकाणी नदीचा पुर ओसरेपर्यंत प्रवाशांना निवास करता यावेत असे निवारे बांधले, असे विचार महीला ऊसतोड कामगार संघटनेच्या अध्यक्ष मनिषा तोकले यांनी अहील्यादेवी होळकर जयंती निमित्त मार्गदर्शन करताना व्यक्त केले.
महीला ऊसतोड कामगार संघटना महाराष्ट्र आणि महीला किसान अधिकार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने महाराणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती साजरी बीड येथे करण्यात आली. या जयंती निमित्त स्वतः शेती करणाऱ्या महीलांनी एकत्रित येवुन येणाऱ्या पावसाळ्यात शेतीच्या पिक पेरणीचे नियोजन केले. बीड तालुक्यातील ४० महीला कमि खर्चाची शेती करत आहेत.त्या महीलांनी एकत्र येवून राजमाता अहिल्यादेवी देवी होळकर यांची जयंती साजरी केली.

# समाजप्रबोधनासाठी तळमळीने कार्य करणाऱ्या मान्यवरांचा परळीत सन्मान

अंबाजोगाई । प्रतिनिधी
भारत देशाला स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता हा मार्ग घटनात्मकरीत्या दाखवून वंचित उपेक्षितांना सामाजिक प्रवाहात आणणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची मशाल तेवत ठेवण्याचे काम समाजातील अनेक घटक आपापल्या परीने तळमळीने करीत असतात. त्यामुळे ही विचारांची मशाल आजही जिवंत आहे. या मशालीला अखंडितपणे तेवत ठेवण्याचे काम करणाऱ्या विविध क्षेत्रातील समाजप्रबोधन करणाऱ्या मान्यवर सामाजिक कार्यकर्त्यांचा नुकताच परळी येथे सिद्धार्थनगर मधील बौद्ध विहारात अत्यंत प्रेरणादायी वातावरणात सहृद्य सत्कार करण्यात आला.
यावर्षीच्या पुरस्कारासाठी शैक्षणिक व साहित्य क्षेत्रात काम करणारे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे आणि वैद्यकीय व व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात अतुलनीय काम करणारे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांना समितीच्या वतीने स्मृतीशेष ईश्वरजी कागदे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'डॉ बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय समाजभूषण' पुरस्कार देऊन गौरवांकीत करण्यात आले.
या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ ध्यानसाधक व सामाजिक कार्यकर्ते उत्तम कांबळे तर प्रमुख पाहुणे म्हणून उपजिल्हाधिकारी महादेव किरवले, प्रा.माधव रोडे, प्रा.डॉ.विनोद जगतकर, प्रा.डॉ.सिद्धार्थ तायडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात मनोगत व्यक्त करीत असताना आयोजक सचिन कागदे यांनी समाजामध्ये विविध क्षेत्रात कार्यरत असणारे आणि समाजप्रबोधनाचे महान कार्य हाती घेतलेले, वंचित उपेक्षितांच्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी लढणाऱ्या लढवय्या सामाजिक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणा देण्यासाठी, त्यांचे कौतुक करण्यासाठी हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आल्याचे सांगितले. या सत्काराला उत्तर देत असताना सुप्रसिद्ध मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी हे पुरस्कार कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना नवीन ऊर्जा देत असतात आणि यामुळे ते पुढील कार्य करण्यासाठी प्रेरित होतात. स्मृतीशेष ईश्वरजी कागदे हे एक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते होते विषमतेच्या अनेक लढाया त्यांनी लढल्या आणि समाजासाठी शेवटपर्यंत ते झुंजत राहिले. त्यांच्या या कार्याला त्यांच्या मरणोत्तर जीवंत ठेवण्यासाठी पप्पूजी कागदे, सचिनजी कागदे या त्यांच्या पुत्रांनी हा पुरस्कार सोहळा त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी ठेवला आहे. हे एखाद्या माणसाच्या कार्याला अजरामर कसे करायचे याचे उत्तम उदाहरण आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.

# डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया यांचे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन : सुभाष लोणके

बीड । प्रतिनिधी
परिवर्तनवादी स्मृतीशेष आत्मारामजी चांदणे यांच्या जयंतीनिमित्त डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया बीड जिल्ह्याच्या वतीने येत्या ९ जून रोजी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.
बीड जिल्हा हा पुरोगामी विचारांचा जिल्हा आहे येथे अनेक विचारवंत सामाजिक कार्यकर्ते चळवळीला नवी दिशा देणारे व्यक्तिमत्व बीडच्या माती त जन्माला आले यातच दलित व आंबेडकरी चळवळीला एक नवी दिशा देणारे व्यक्तिमत्व बीड जिल्ह्याच्या माती जन्माला आले स्मर्तिशेष आत्मारामजी चांदणे आंबेडकरी विचाराला व दलित वंचित शोषित वर्गाला एक नवी दिशा देणाऱ्या व्यक्तिमत्व आंबेडकरी चळवळ महाराष्ट्र भर उभा करणारे एक कणखर व्यक्तिमत्व व अभ्यास दलित नेतृत्व आत्माराम चांदणे यांनी आपलं आयुष्य दलित पीडित वंचित सुचित समाजाच्या न्याय हक्कासाठी उन्नतीसाठी व त्यांच्या प्रगतीसाठी समर्पित केले जिल्ह्यातील सर्व जाती धर्माच्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन आंबेडकरी चळवळीची एक नवी फळी उभा केली वंचित शोषित लोकांच्या न्याय हक्कासाठी आपलं संपूर्ण आयुष्य ते सतत राहिली आयुष्यभर आंबेडकरी चळवळीचा लढा लढत राहिले इथल्या न्यायव्यवस्थे व समाज व्यवस्थेच्या विरुद्ध आंबेडकरी विचारांची शिदोरी सोबत घेऊन समाज व्यवस्थेने नाकारलेल्या समाजासाठी व त्यांना स्वाभिमानाने जगण्यासाठी आत्मारामजी चांदणे यांनी लढा दिला त्यांची चळवळ त्यांचे विचार आजही प्रेरणादायी आहेत त्यांच्या या कार्याला व त्यांच्या लढ्याला एक उजाळा म्हणून येत्या नऊ जून रोजी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया बीड जिल्ह्याच्या वतीने कार्यकर्ता शिबिर आयोजन केले आहे या शिबिराला पक्षाचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक सुकुमार जी कांबळे पक्षाचे राज्य अध्यक्ष श्री अजिंक्य भैय्या चांदणे व पक्षाचे ज्येष्ठ नेते अशोक बाप्पा सोनवणे हे आवर्जून उपस्थित राहणार आहेत आयोजक व डी पी आय चे जिल्हाध्यक्ष सुभाष लोणके यांनी या शिबिराचे आयोजन केले आहे.

# नांदूरघाट ग्रामपंचायतचा महाराष्ट्रमधील पहिलाच ऐतिहासिक निर्णय

## जि.प. शाळेमध्ये शिकणाऱ्या पाल्याच्या कुटुंबाचा पूर्ण टॅक्स माफ

नांदुर घाट । प्रतिनिधी
नांदुर घाट ग्रामपंचायतने एक मोठा निर्णय घेतला व प्रोसिडिंग व ठराव घेऊन निर्णय असा घेतला की जिल्हा परिषद शाळेमध्ये ज्यांचा पाल्य असेल मग तो पहिलीला असो किंवा चौथीला असो किंवा पाचवी सहावी सातवी असो जोपर्यंत जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकत आहे तोपर्यंत त्या कुटुंबाचे घरपट्टी किंवा इतर जे कर असतात ग्रामपंचायतचे ते पूर्णपणे माप केले जातील असा ऐतिहासिक निर्णय नांदूर घाट ग्रामपंचायत ने घेतला आहे या निर्णयामुळे जिल्हा परिषद शाळा नक्कीच दर्जेदार व सुविधायुक्त होईल बीड जिल्ह्यातील पहिली नांदूर घाट ग्रामपंचायत असेल तसेच मराठवाडा व महाराष्ट्रातील पहिलीच ग्रामपंचायत आहे ज्या ठिकाणी जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणाऱ्या पाल्याच्या कुटुंबाचा सर्व कर पूर्णपणे माफ करणारी.
नांदुर घाट जिल्हा परिषद शाळा ही निजाम कालीन आहे१९२० ची स्थापना असून या ठिकाणी पहिली ते सातवी शाळा पूर्णपणे२०१८ सुरळीत सुरू होती परंतु राजकीय हेवेदावे व संस्थानिकांचा स्वार्थ यामुळे गावची शाळा बंद पाडण्याच्या मार्गावर होती परंतु दीड वर्षांपूर्वी सत्ता परिवर्तन झाले व गावकरी व शाळा समिती यांच्या माध्यमातून शाळा जिवंत ठेवण्याचे परिश्रम सुरू झाले नियमाप्रमाणे एक ते पाच हा पट शासनाचा असून सुद्धा नांदूर ला पाचवीचा वर्ग सुरू करण्यासाठी अधिकारी वर्गाने विरोध केला शाळा समिती व गावकऱ्यांनी पाचवीचा वर्ग सुरू केला टीसी इतर जिल्हा परिषद शाळेमध्ये टाकले व लेकरं शिकवले मान्यता असून सुद्धा आर्थिक तडजोड करून संबंधित अधिकाऱ्यांनी नांदुर घाट जिल्हा परिषद शाळा बंद करण्याचा घाट केला परंतु शाळा समितीचे अध्यक्ष अमोल जाधव यांनी वारंवार कागदोपत्री पाठपुरावा हायकोर्ट संभाजीनगर या ठिकाणी याचिका देखील दाखल केली त्या ठिकाणचा निकाल देखील लागत आहे व महत्त्वाचे म्हणजे नांदुर घाट मधील विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकायचे म्हणतात तरी देखील शासन व संबंधित अधिकारी खाजगी संस्थानिकांच्या आमिषाला बळी पडत आहे परंतु हा गावकऱ्यांचा लढा व ग्रामपंचायत चा ऐतिहासिक निर्णय यात नक्कीच विजयी होणार व गोरगरिबांचे लेकर शिकणार.
बीड जिल्ह्यामध्ये सी ओ साहेब कर्तव्यदक्ष आले असे बोलतात व शिक्षण विभागातला भोंगळ कारभार चव्हाट्यावर व ओपन केला ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांनी स्वागत केले परंतु ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा तिथल्या पाहिजेत कारण हजारो रुपये फीस खाजगी संस्थेत शेतकरी भरू शकत नाही तसेच स्पर्धेच्या काळात जिल्हा परिषद चा पोरगा टॉप होत आहे नांदुर घाट ग्रामस्थांची एवढीच मागणी आहे आदित्य जीवनी साहेब नांदुर घाट ची जिल्हा परिषद शाळा महाराष्ट्रातील टॉप ची शाळा होईल जो नियमाने आहे तसेच उपसंचालक शिक्षण विभाग यांनी पत्र देऊन सुद्धा तुमच्यापर्यंत संबंधित अधिकाऱ्यांनी पत्र येऊन देऊ दिले नाही परवानगी देण्याचा अधिकार तुम्हाला आहे कारण नवीन परवानगी या शाळेला नको आहे पुनर्जीविक शाळा करत आहेत गावकरी यु–डायस कोड तात्काळ देण्यात यावा नसता संबंधित पूर्ण गावकरी तीव्र आंदोलन करतील जिल्हा परिषद शाळा वाचवण्यासाठी कारण जी निजामकालीन शाळा आहे या शाळेमध्ये पूर्ण वर्ग खोल्या आहेत जागा आहे तसेच महत्त्वाचे म्हणजे पूर्ण शाळेला कंपाउंड वॉल ग्रामपंचायत ने केले आहे कारण विद्यार्थी दोन गेटमधून आत मध्ये एन्ट्री करत आहे महत्त्वाचे म्हणजे पूर्ण शाळा सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणी खाली आहे एवढी सुविधा व एवढे गावकऱ्यांचे लक्ष असताना अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष का कारण केज गटशिक्षणाधिकारी आर्थिक तडजोडी मध्ये संस्थानिकांच्या जाळ्यात अडकलेला असल्याचे दिसून येत आहे याची पूर्ण सखोल चौकशी करून कारवाई करा व लेकरांना जिल्हा परिषद शाळेत शिकू द्या अशी गावकऱ्यांची मागणी होत आहे.

"मागील एक वर्षापासून शाळा समितीचा अध्यक्ष झाल्यापासून शाळा पूर्णपणे सुसज्ज केली आहे तसेच पूर्ण शाळा सीसीटीव्ही कॅमेरा तसेच ज्या भौतिक सुविधा आहेत त्या पूर्णपणे केल्या आहेत महत्त्वाचे म्हणजे शिक्षण उपसंचालक यांनी पत्र दिले आहे सीओ यांना त्यांना वर्गाची मान्यता तुमच्या स्तरावर देऊन टाका तरी देखील आणखी यु–डायस कोड दिला नाही नवीन मान्यता नको आहे पुनर्जीवित पहिलीच मान्यता असून ती आणखी जीवने साहेबांनी दिली नाही हे दुर्दैव आहे गावकरी जिल्हा परिषद वाचवण्यासाठी प्रयत्न करत असताना संबंधित गटशिक्षण अधिकारी आर्थिक तडजोड संस्थानिकाचे करून जिल्हा परिषद बंद करण्यासाठी प्रयत्न करत आहेत हे दुर्दैव आहे सिओ साहेबांनी पुनर्जीवित आमची शाळा नाही केली तर शाळा सुरू व्हायच्या आत मोठे आंदोलन केले जाईल.

**– अमोल जाधव (शा.शि स. अध्यक्ष)**

"जिल्हा परिषद शाळा गावचा महत्वाचा घटक आहे व या शाळेसाठी ज्या सुविधा जी गरज लागण ती ग्रामपंचायत मार्फत पुरवली जाईल जिल्हा परिषद शाळा टिकली पाहिजे त्याचमुळे हा ऐतिहासिक निर्णय आम्ही घेतला आहे सर्व पाल्यांच्या कुटुंबाचा कर माप आम्ही करत आहोत आज ठराव सर्वानुमते पारित केला आहे.

**– सुनिता युवराज जाधव (सरपंच)**

"नांदुर घाट जिल्हा परिषद शाळेसाठी शाळा समितीचे अध्यक्ष उपोषण करतात हायकोर्टात याचिका दाखल करतात फक्त शाळा जिल्हा परिषद ची वाचवण्यासाठी त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे तसेच सर्व सुविधा व शिक्षणाची कॉलिटी टॉपची करत आहेत तरीदेखील संबंधित गेंड्याची कातडी पांगरलेले अधिकारी खोडा घालत असतील तर ते सहन केले जाणार नाही नांदूरची जिल्हा परिषद शाळा पुनर्जीवित झालीच पाहिजे नवीन मान्यता नव्हे ती पूर्व मान्यता आहेच वर्ग तात्काळ सुरू झालेच पाहिजेत नसता याचे परिणाम वेगळे होतील त्यामुळे तात्काळ सिओ साहेबांनी निर्णय घेऊन निजाम कालीन शाळा वाचवावी कारण शाळा समितीचे अध्यक्षाला उपोषणाची वेळ येते ते देखील जिल्हा परिषद वाचवण्यासाठी हे शासनाने करायला पाहिजे ते गावकरी करत आहेत त्यामुळे तात्काळ शाळा सुरू होण्याच्या आत निर्णय देऊन शाळा वाचवावी नसता भविष्यात होणाऱ्या आंदोलन व अडचणीला तोंड द्यावे लागेल संबंधित अधिकाऱ्यांना मी गावकरी यांच्यासोबत आहे व या आंदोलनाचा मी देखील घटक होईल पुढील अनर्थ टाळण्यासाठी तात्काळ निर्णय घ्यावा.

**– बजरंग सोनवणे (खासदार)**

"नांदुर घाट जिल्हा परिषद शाळा ही सर्व नियमाने असताना अधिकाऱ्यांचा घाट शाळा बंद करण्यासाठी का शाळा सुरू होण्याच्या आत गावकरी तीव्र आंदोलन उभा करतील आम्ही सर्व नियमाने करत असताना सरकारी शाळा मोडण्याचा घाट कशासाठी नांदूरच्या शाळेला नवीन परवानगी नको आहे जी शाळा होती तीच पूर्ववत करा हीच मागणी आहे गावकरी व विद्यार्थ्यांची केज तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी हे संस्थानिकांच्या आर्थिक तडजोडी मध्ये गुंतलेले चे दिसून येत आहे नांदूर ची शाळा वाचली पाहिजे नसता तीव्र आंदोलन छेडले जाईल.

**– शंकर जाधव (तालुका अध्यक्ष रा.काँ.पक्ष श.पवार गट)**

पान १ वरून...

### आ.प्रकाश दादा डोकं भानावर ठेवून रस्ता दुरुस्तीचे...

झाला आहे. सर्व जखमी गंभीर आहेत. त्यांना तेलगाव येथील रूग्णवाहिकेने माजलगाव येथील रूग्णालयात उपचारार्थ पाठविण्यात आले. यात फारूक चॉंद सय्यद, त्यांच्या पत्नी सय्यद शबाना फारूक, शेख नोहिद एजाज आणि फैजान रफिक सय्यद अशी चौघांची नावे आहेत. तसेच ट्रकच्या आणि दुचाकी च्या समोरासमोर झालेल्या धडकेत महारुद्र भीमराव लोंढे (रा. खालापुरी, बीड) असेल मैत्रीचे नाव असून विठ्ठल गाऊन माजलगावकडे दिवसातून जात असताना अपघात घडला. सर माजलगाव ऊन तेलगाव कडे जाणारा ट्रक एमएच ४४ ७३७१ या ट्रकने दुचाकीस्वाराला चिरडले. रात्री झालेल्या अपघातातील मयताच्या जवळ असलेल्या आधारकार्डवरून त्यांची ओळख झाली. अपघातातील इतर मयत व जखमींचे नावे उपलब्ध होऊ शकले नाहीत. आयशर चालक घटनास्थळावरून पसार झाला. अपघाताची माहिती मिळताच दिंद्रुड पोलीस ठाण्याचे सपोनि महादेव ढाकणे यांच्यासह पोलीस कर्मचारी महेश साळुंखे, खलील मोमीन, सचिन गायकवाड, कानदास बनसोडे, चामनर आदि तात्काळ घटनास्थळी दाखल झाले होते.

### आयपीएस विश्वास नांगरे पाटील यांचे...

विश्वास नांगरे पाटील साहेब यांना स्पेशली विनंती केल्याचा विश्वास दिला.
त्यानंतर आरोपींनी व्हॉट्सअप व्हिडिओ कॉल द्वारे मुंबई पोलिसांचे ऑफिस, झेंडे, लोगो दाखवून खोटे वातावरण निर्माण केले. डिजिटल अरेस्टमध्ये असल्याचे सांगून, भीती दाखवत शिक्षिकेकडून आर्थिक व्यवहार करवून घेतले. हे सर्व खरे असे समजून सावित्री यांनी २१ मे रोजी पहिल्यांदा एकाचवेळी ३५ लाख १० हजार रूपये ऑनलाईन पाठविले. त्यानंतर वेगवेगळ्या दिवशी त्यांनी २९ मे पर्यंत ८३ लाख १ हजार ८१६ रूपये सायबर भामट्यांना पाठविले.
या दरम्यान पीडित शिक्षिकेला सातत्याने फोन व व्हिडिओ कॉल करत त्यांच्यावर दडपण आणले जात होते. ३० मे रोजी गुन्हेगारांनी व्हॉट्सअपवरून त्यांना ब्लॉक केले आणि फोन बंद केला. त्यानंतर त्यांना फसवणूक झाल्याचे लक्षात आले आणि सायबर पोलिस ठाणे गाठत फिर्याद दिली. त्यावरून शनिवारी गुन्हा दाखल झाला आहे.
या प्रकरणाचा तपास सायबर पोलिसांनी हाती घेतला असून नागरिकांनी अशा बनावट कॉलपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आधारकार्ड, बँक खात्यांची माहिती कोणालाही देऊ नये आणि संशयास्पद कॉल आल्यास त्वरित नजीकच्या पोलिस ठाण्यात संपर्क साधावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**सोने, प्लॉट गहान ठेवून घेतले कर्ज**

सायबर भामट्यांनी सावित्री यांना भिती दाखवत तुमच्याकडे कोणती संपत्ती आहे, हे आम्हाला येथे दिसते. तुम्ही लपवुन ठेवु नका, असे सांगितले. त्यानंतर सावित्री यांनी सोने, प्लॉट गहान ठेवुन त्यावर कर्ज घेतले आणि २९ मे रोजी हे सर्व पैसे भामट्यांना ऑनलाईन पाठविले.

# दिवाळीच्या निमित्ताने भूमिहीन, अपंग, निराधार आशा ६५० कुटुंबांना किराणा किटचे वाटप

बीड । प्रतिनिधी

बिकट परिस्थितीतुन प्रतिकुल परिस्थिती मध्ये येत आणी सतत समाजासाठी काही तरी वेगळ करावे या सामाजीक भावणेची जान ठेवुन गोर गरीब, कष्टकरी, अपंग, निराधार असणाऱ्या समाजासाठी गुरु आनंद महिला प्रतिष्ठान ची स्थापना करुन सामाजी कार्याची सुरवात केली त्याच माध्यमातून मागील अनेक वर्षापासून रमजान निमित्त हिंदु, मुस्लिम समाजातील कुटुंबना धान्य वाटप, झोपडपट्टी मध्ये जेवण वाटप व सिव्हिल हॉस्पीटल मध्ये खिचडी वाटप करणे, १०० जि. प.शाळेला ज्या शाळा वाड्यावस्तीवर दुर्गम भागात आहे. या ठिकाणी सर्व मुलांना शालेय साहित्य वाटप करणे, गरीब कुटुंबला लग्नसाठी संसार उपयोगी वस्तू वाटप करणे, बीड जिल्ह्यातील १५० जि.प. शाळा ज्या वाड्यावस्त्यावर, दुर्गम




ठिकाणी आहे आशा शाळे मधील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करणे. ७०००० नोटबुक, २०००० पेन, २०००० पेन्सिल, २०००० शॉपनर... जवळ पास ३ महिने हा उपक्रम सातत्याने चालू, दिवाळीनिमित्त भूमिहीन, अपंग, निराधार आणि मुस्लिम आशा १००० कुटुंबंना जे ग्रामीण भागातील व शहरी भागातील झोपडपट्टी मधील किराणा किट वाटप करण्यात आले.

अनेक झोपडपट्ट्यांमध्ये जाऊन जेवण वाटप करणे, श्रीमती सिमाताई ओस्तवाल यांच्या याच कार्याची दखल घेवुन त्यांना २०२५ उत्कृष्ट सामाजिक कार्यासाठी पद्मपाणी प्रतिष्ठानच्या वतीने सन्मानित करण्यात आले तसेच याही सन्मानाची दखल घेत आणी श्रीमती सिमाताई ओस्तवाल यांनी बीड शहरासह बीड जिल्ह्याचे नाव समाज सेवेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात नाव लौकिक करणाऱ्या ज्यांना लेडी सिंघम, समाजसेविका असेही संबोधतात अशा श्रीमती सीमाताई ओस्तवाल यांचा के.जी.एन. ग्रुपच्या वतीने सन्मान के.जी.एन.ग्रुप ऑफ महाराष्ट्र चे संस्थापक तथा छंप्पर बंद मुस्लिम विकास महामंडळाचे अध्यक्ष मा.जहीर अली शाहा कादरी साहेब, इंजी. सोहेल भाई, सुशांत सत्राळकर यांच्या हस्ते शाल, स्मृतिचिन्ह व पुष्पगुछ देवुन सत्कार करण्यात आला. यावेळी के.जी.एन.ग्रुपचे इंजी. शोएब कादरी, जोहेब कादरी, सय्यद मुजम्मील, अकबर कादरी, जुबेर कादरी यांची उपस्थिती होती.

# शेख मतीन यांच्या गुडलक ट्रेडर्सचे थाटात उद्घाटन

## शून्यातून पुढे येत झाले दुकानाचे मालक

बीड । प्रतिनिधी

शहरातील आसेफ़नगर भागात शेख मतीन यांच्या गुडलक ट्रेडर्स या दुकानाचे उद्घाटन हाफ़ीज़ सईद साहब यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

आसेफ़नगर भागातील रहिवाशी मतीन मोईन शेख यांनी शून्यातून पुढे येत गेल्या अनेक वर्षांपासून दरदिवशी पहाटेपासून मध्यरात्रीपर्यंत केलेला संघर्ष, आलेल्या अनेक अडचणींवर मात करत स्वत:चे दुकान टाकावे, हे पाहिलेले स्वप्न दिनांक १ जून २०२५ रविवार रोजी संध्याकाळी ०६:०० वाजता आपल्या गुडलक ट्रेडर्स या दुकानाची सुरुवात करून प्रत्यक्षात उतरविले आहे. या दुकानाच्या उद्घाटनावेळी शुभेच्छा





व आशीर्वाद देण्यासाठी हमराह ट्रेडर्सचे मालक-संचालक तथा शेख मतीन यांचे मार्गदर्शक शाहिद उर्फ शकील खान पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शेख मोईन, शेख हारून, शेख जुबेर, शेख हुमेर, शेख मुबीन, धन्नासेठ इनामदार, शरीफ़ भाई, अब्दुल ख़दीर भाई, अखलाख शेख, इमरान सय्यद, अब्दुल जब्बार खान, शेख वसीफ, शेख शोएब, शेख ज़ोएब, शेख जुनैद, शेख अरशियान, शेख मुस्तक़ीम, शेख ऊज़ेर, शेख हकीम सह अनेकांची उपस्थिती होती. या दुकानाच्या निमित्ताने व्यवसाय क्षेत्रात पाऊल ठेवल्याबद्दल मतीन शेख यांचे शेजारी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी भरभरून हृदयी शुभेच्छा दिल्या.

# तरुणांनी अहिल्यादेवी होळकर यांचे विचार आचरणात आणावेत : सरपंच गोफणे

आष्टी । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी महिलांसाठी फार मोठे योगदान दिले आहे त्यांची जयंती प्रत्येकाने आपल्या गावात साजरी करणे गरजेची आहे कारण या कोणता देवी अहिल्याबाई होळकर यांनी आपला आयुष्य जनसेवेसाठी अर्पण केले आहे, असे मत भोजे वाडी येथील सरपंच बाबासाहेब गोफणे यांनी व्यक्त केले. भोजेवाडी तालुका आष्टी येथे भव्य दिव्य अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे मिरवणूक काढण्यात आली ढोल ताशाच्या गजरात ही मिरवणूक करण्यात आली.



यावेळी जिल्हा परिषदेतील विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी शिवाजी गोफने, शंकर लकडे, संजय पारखे, कृष्णा खटके, सिताराम पालवे, धुळाजी लकडे, अमोल खटके, एडवोकेट करणे, सुखदेव खटके, अमोल पालवे आदी मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरवर्षी या गावात मोठ्या उत्साहात ही जयंती साजरी करण्यात येते.

# पुण्यश्लोक राजमाता अहिल्या देवी होळकर जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर संपन्न

बीड । प्रतिनिधी

पुण्यश्लोक राजमाता अहिल्या देवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सेवा भारती देवगिरी,जिल्हा बीड आणि लोकसेवा मंडळ ट्रस्ट, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने माता रमाई नगर, बीड येथील सेवा भारती संचलित माता रमाई ओपीडी येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन दिनांक ३१ मे २०२५ रोजी करण्यात आले. या शिबिरात एकूण ४१ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक उत्तरदायित्व निभावले.

या कार्यक्रमाला सेवा भारती देवगिरी प्रांत सहसचिव डॉ. सुभाष



जोशी, जिल्हाध्यक्ष डॉ. विनोद ओस्तवाल, जिल्हा सचिव महेश कुलकर्णी, कोषाध्यक्ष सुनील खजिनदार, डॉ. पुरुषोत्तम कुलकर्णी, डॉ. पालवणकर, गोपाळ नाईक, तसेच सामाजिक कार्यकर्ते अशोक थोरात आणि अलका ताई ताकतोडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी पूर्णवेळ रुग्णमित्र नारायण पवार, रवींद्र फड, शंतनू घाडगे, विजय कोठुळे, यशवंत देशमुख, मुकुंद कुलकर्णी,कुलदीप साखरे, अशोक घोडके, अश्विन ताकतोडे, अमोल शिंदे, प्रशांत घुगरे, बंकट वैष्णव यांचे विशेष योगदान लाभले. तसेच जिल्हा रुग्णालय रक्तपेढी बीड येथील कर्मचारी वर्गाने देखील मोलाचे सहकार्य केले.

# गोपीनाथगडावरील आजचा कार्यक्रम प्रेरणा अन् उर्जेचा ; मोठया संख्येने उपस्थित रहा

## ना.पंकजाताई मुंडेंनी दिलं सर्वांना निमंत्रण



परळी वैजनाथ । प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा पुण्यतिथी दिन म्हणजेच तीन जून हा गोपीनाथ मुंडे परिवाराचा पारिवारिक कार्यक्रमासून हा कार्यक्रम पारंपरिक पद्धतीने साजरा होणार आहे. कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन केले असुन सर्वांनी उपस्थित राहावे असे निमंत्रण ना. पंकजाताई मुंडे यांनी दिले आहे. याबाबत ना. पंकजाताई मुंडे यांनी एका व्हिडिओद्वारे सर्व मुंडे प्रेमींना आवाहन केले आहे. ३ जून हा दिवस उजडूच नये असे आपल्या सर्वांनाच वाटते. मात्र गोपीनाथराव मुंडे यांच्या विचारावर मार्गक्रमण करून प्रेरणा व ऊर्जा घेण्यासाठी तीन जूनला आपण सर्वजण मोठ्या संख्येने गोपीनाथ गडावर येत असता. त्या दृष्टिकोनातून यावर्षीही तीन जून रोजी पारंपरिक पद्धतीने हा पुण्यतिथी दिन साजरा केला जाणार आहे. रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक यांचे कीर्तन व महाप्रसाद असा हा गोपीनाथ मुंडे परिवाराचा पारिवारिक कार्यक्रम आहे. तरी सर्वांनी तीन जून रोजी सकाळी ११ वाजता गोपीनाथ गडावर उपस्थित राहावे असे आवाहन राज्याच्या पर्यावरण तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

# बाबूराव केशवराव गालफाडे यांच्या जन्म दिनानिमित्त २ जून रोजी बैठकीचे आयोजन

केज । प्रतिनिधी

सामाजिक कार्यकर्ते बाबुराव केशवराव गालफाडे यांच्या जन्म दिनानिमित्त बैठकीचे आयोजन प्रमुख उपस्थिती प्रा.डॉ. मच्छिन्द्र सकटे सर, दलित महासंघ, संस्थापक अध्यक्ष तथा मा. चेअरमन लो. अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मुंबई, मा. नितीन जी कांबळे लहुजी क्रांती मोर्चा, कार्याध्यक्ष म.रा. मुंबई, मा. राजेश जी घोडे प्रमुख आझाद क्रांती सेना, प्रा.डॉ. सिद्धार्थ शिनगारे, मा. दिपक थोरात आरंभ बीड संपादक इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तरी सदर कार्यक्रमास सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहावे ही विनंती. डि.के. जाधव नाना, दगडू तात्या गालफाडे, डॉ. वैजेनाथ क्षीरसागर, तसेच मनोहर गालफाडे सर, विनायक लोंढे, शरद थोरात, इरफान पठाण, पांडुरंग कसबे, बाळासाहेब गालफाडे हे सर्व सन्माननीय मित्रमंडळ सोमवार दिनांक ०२ जुन २०२५ रोजी दुपारी ठीक ०३:३० वाजता ठिकाण शासकीय विश्राम ग्रह केज येथे आयोजन करण्यात आले आहे.




बीड : सरकारी कामगार अधिकारी कार्यालय बीड येथील श्रीहरी मुंडे यांचा दि. ३० रोजी सेवानिवृत्तीच्या निरोप समारंभ प्रसंगी कामगार नेते भाई गौतम आगळे सर, भाई राजेश कुमार जोगदंड मराठवाडा अध्यक्ष, रोजंदारी मजदुर सेना यांनी शाल व पूष्पगुच्छ देऊन सत्कार केला.



बीड : या वर्षी मान्सून सुरू होण्याअगोदरच बिंदुसरा धरण ओव्हर फ्लो झाले असून तिथे बीडकरांचा सहली सुरू झाल्या आहेत त्यात अनेक जण नको ते काम करून स्वत: चे जीव धोक्यात घालत असताना दिसत आहेत, मेन रोड सुद्धा गाड्यांची गर्दी होत आहे अशा घटनांमध्ये अनेक वेळा कितीतरी युवकांचे जीव गेले आहेत तरी सुद्धा बीडकरांची खाजवून अवदान घेण्याची सवय जात नाही पोलीस प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

# धोंडराई येथील पावन हनुमानाच्या दरबारात वृक्षांची सावली

## राजेंद्र साखरे यांनी केला वृक्ष लागवडीसोबत संगोपनाचा ध्यास!

## प्रत्येकाने वृक्ष लागवडीचा संकल्प करावा तरुणांचे आवाहन

गेवराई । प्रतिनिधी

वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' हे गाण्यापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृती झाली पाहिजे, हा निर्धार धोंडराईतील तरुणाईने केला आहे. आतापर्यंत अनेक रोपांची लागवड करून त्याचे संवर्धन करण्यासाठी तरुण-तरुणी पुढे येत आहेत आणि याचाच एक भाग म्हणून पुन्हा या पुढील सहा महिन्यांत रोपांची लागवड पावन हनुमान मंदिराच्या परिसरात करण्याचा दृढ निश्चय केला आहे, नागरिकांमध्ये केवळ जनजागृती नाही, तर ऑक्सिजन निर्मितीचा हा ध्यास पुढच्या पिढीला फायदेशीर ठरणार आहे.वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे, याची जाणीव तरुण पिढीला झाला आहे. पर्यावरण बदलाची झळ माणसांसह पशु-पक्ष्यांना पोहचू लागली आहे. पर्यावरणाचा समतोल प्रदूषणामुळे ढासळत असताना वृक्ष आपल्याला प्राणवायू मुबलक देत असतो. त्यामुळे या तरुणाईने वृक्ष लागवड करून ते जतन करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.आपण अनेक संकल्प करतो आणि ते कृतीत उतरवत असतो. काही संकल्प पूर्ण होत नाहीत, मात्र समाजासाठी बांधील आहोत, हा प्रेरणेने वृक्षलागवडीचा संकल्प करत धोंडराई गावाच्या सर्व तरुणाईने केला आहे. अधिक पुढे लागवड केली जाणार आहे. अशी माहिती राजेंद्र



साखरे यांनी दिली आहे त्यामुळे पावन हनुमानाच्या साक्षाने परिसर भविष्यात हिरवाईने परिसर बहरणार आहे.माणसाला स्वछंदी वातावरण, पक्ष्यांचा किलबिलाट व सामाजिक वातावरण उत्तम मिळावे, म्हणून हा प्रयत्न केला जात आहे.

धोंडराई गावातील अमृता नदीच्या काठी जागृत पावन हनुमान मंदिर मंदिराच्या परिसरात गावातील युवकांनी वृक्ष लागवडीचा संकल्प घेतला आहे. सोशल मीडियाचा वापर गावाच्या विकासासाठी व सुसज्ज बनवण्यासाठी करावा असा एक संदेश देत युवकांनी हा संकल्प राबविले आहे. जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक वृंदांनी सर्व प्रथम वृक्षारोपण केले आहे. तसेच वृक्षवल्ली पावन हनुमान मंदिर या ग्रुपच्या माध्यमातून दहा ते पंधरा युवकांच्या ग्रुपने गेल्या तीन ते चार वर्षापासून धोंडराई गावातील युवकांनी अनेक फुलांचे फळांचे व शोभेचे झाडे लावले आहेत. हा संकल्प मंदिराच्या परिसरात घेण्यात आला एक सुसज्ज प्रशस्त ठिकाण म्हणून गावाची ओळख व्हावी यासाठी युवकांनी संकल्प घेतला गेला. आणि त्या माध्यमातून एक सुसज्ज गाव ओळखले जावे यासाठी गावातील युवक वर्गाचे प्रयत्न आहे.

प्रत्येक रविवारी किंवा शासकीय सुट्टी किंवा वेळ बघून झाडाची निगा राखली जाते. व मंदिराच्या परिसरात एक स्वच्छता मोहीम राबवली जाते. युवकांच्या ग्रुपचा प्रत्येक सदस्य जसा वेळ भेटेल तसा झाडांसाठी वेळ देतो. ग्रुपमधील सदस्य राजेंद्र साखरे, अतुल नरवडे, अक्षय खरात (माऊली), अनिल मगर, रामेश्वर खरात (तात्या), दादासाहेब गावडे, वैभव कदम, पृथ्वीराज सुर्वे, नाशिक खरात, युवराज खरात, लक्ष्मण घाडगे, चंद्रकांत साखरे, माऊली माने, शुभम लेहने, महादेव साखरे, अमोल निकम, गणेश वाघमोडे, यांनी हा संकल्प हाती घेऊन एक आगळा वेगळा संकल्प राबविला आहे. यामुळेच सर्व स्तरावरून या युवकांचे कौतुक केले जात आहे. तसेच त्यांना वेळोवेळी मंदिर कमिटीचे मार्गदर्शन भेटले आहे. अतिशय उत्तम निसर्गरम्य वातावरण या परिसरात आहे. गावातील इतर प्रतिष्ठित व्यक्तीचा वाढदिवस किंवा एनिवर्सरी असेल तर व्यर्थ खर्च करण्यापेक्षा मंदिरासाठी झाडे आपल्या स्वइच्छेने देण्यात यावे यासाठी ग्रुपच्या माध्यमातून सर्वांना आवाहन करण्यात आले आहे.

परिसरात पावन हनुमान मंदिरासह खंडेबाचे मंदिर व वज्रेश्वर महादेवाचे मंदिर आहे. रोज सकाळी देवाला दर्शनासाठी भाविक येतात फुले वाहण्यासाठी घेतात. दरवर्षी रक्षाबंधनला शाळेतील विद्यार्थिनी ग्रुपच्या संकल्पनेतून रक्षाबंधन झाडांना राखी बांधून साजरा केला जातो. भागवत बोराडे, शिवाजी लेहने,अमोल इनामदार, सोपान साखरे, सोमनाथ वखरे, रामलाल निकम, रामेश्वर कोकाटे, निलेश खरात यांनी मंदिरासाठी झाडे दिली आहेत. जनार्दन मामा चातुर, रविराज भैय्या खरात, जालिंदर साखरे, यांचे आमच्या ग्रुपला वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

# आ.प्रकाश सोळंके तुम्ही मातंग आणि धनगर समाजात वाद पेटवण्याचे काम सुरु केले का?


## लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी मागणी केलेली जागा धणगर समाजाला देऊ अशी केली घोषणा

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरामध्ये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे भव्य स्मारक व्हावे यासाठी वारंवार मातंग समाजाने मागणी केलेली होती पण ही मागणी अजूनही प्रलंबितच आहे त्यामुळे सामाजिक मंत्री तसेच या अगोदर पण निवेदनाद्वारे समाज बांधवांनी अनेक वेळा प्रशासन व आमदार यांच्याकडे मागणी केलेली होती पण ती मागणी अजूनही पूर्ण झालेली नाही आणि त्यातच आमदार प्रकाश सोळंके यांनी मातंग समाजाने मागणी केलेली ती जागा धनगर समाजाला देऊ अशी घोषणा करून दोन समाजामध्ये वाद पेटवण्याचे काम सुरू केलेले आहे असा आरोप मातंग समाज बांधवांनी केलेला आहे.

माजलगाव शहरामध्ये केसापुरी कॅम्प येथील जागा लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी देण्यात यावी अशी मागणी सामाजिक नेते अनिल राधे कांबळे यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ व स्थानिक प्रशासन यांच्याकडे केली होती तसेच







या अगोदर पण समाजातील अनेक सामाजिक नेते व कार्यकर्त्यांनी या जागेची मागणी केलेली होती परंतु प्रकाश सोळुंके यांनी जाणून-बुजून ती जागा धनगर समाजाला हस्तांतरित करून देऊ असा शब्द दिला. त्यामुळे मातंग समाजाच्या भावना दुखावल्या आहेत व सोळंके यांच्याविषयी समाजातून प्रचंड रोष व नाराजी व्यक्त केली जात आहे. इलेक्शन जवळ आले की मातंग समाजाला भूलथापा द्यायच्या मोठ्या मोठ्या गप्पा मारायच्या व इलेक्शन झाले निवडून आले की कोण कुठला व कोणता समाज अशी सवय प्रकाश सोळंके यांना झाली आहे. प्रकाश सोळंके यांनी नेहमी मातंग समाजासोबत दुजा भाव केलेला आहे. आमदार सोळंके यांनी मातंग समाजाच्या मतावर अनेक वेळा सत्ता भोगली पण त्यांनी प्रत्येक वेळा मातंग समाजाचा फक्त मतदानापुरताच वापर केला. तसेच लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या विषयी पण त्यांच्या मनामध्ये प्रचंड रोष आहे कारण स्मारकाचा विषय काढला की प्रकाश सोळंके हे भडकतात तसेच मातंग समाजाविषयी त्यांच्या मनामध्ये एवढा रोष व द्वेष का आहे असे अनेक प्रश्न समाज बांधवांनी यावेळी उपस्थित केलेले आहेत.

येणाऱ्या काळात स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपालिका यांच्या निवडणुकांचा धुराळा उडणार आहे यामध्ये मातंग समाजाच्या मतांचा परिणाम दिसून येणार व याचा फटका सोळंके यांना नक्कीच बसणार आहे असा अंदाज व्यक्त केला जात आहे. तसेच सोळंके यांना याआधीही मातंग समाजाने भरभरून साथ दिली मत दिले पण त्यांनी नेहमी मातंग समाजाला विकासाच्या बाबतीत डावलले आहे. महापुरुषांचे भव्य असे स्मारक माजलगाव शहरांमध्ये होत आहेत त्यासाठी सोळंके यांनी जागा हस्तांतरित केलेली व स्मारक होत आहेत त्याचा मातंग समाजाला खूप आनंद आहे पण मातंग समाजाची अस्मिता लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचं काय असा प्रश्न यावेळी मातंग समाजाने सोळंके यांना उपस्थित केलेला आहे. प्रत्येक वेळी समाजाला भुलथापा देऊन समाजाला वेड्यात काढण्याचं काम सोळंके हे करत आहेत.

येणाऱ्या निवडणुकांमध्ये दोन समाजांमध्ये वाद पेटवून प्रकाश सोळंके यांना मतांची जुळवा जुळव करायची आहे का असा सवाल यावेळी समाज बांधवांनी उपस्थित केला आहे.त्यामुळे कुठेतरी सोळंके यांनी हे थांबवावे व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी तात्काळ जागा हस्तांतरित करून द्यावी अशी मागणी समाज बांधवांनी केलेली आहे अन्यथा येणाऱ्या काळात या विरोधात तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभे करण्यात येईल अशी माहिती मातंग समाज बांधवांनी दिलेली आहे.

# ग्रामीण भागात रस्त्यांचा अभाव आणि आरोग्यसेवांचा अपुरा पुरवठा ही आजही मोठी समस्या



आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील टाकळी अमिया येथील ससाणे वस्तीपर्यंत पोहचण्यासाठी जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. वेशीपासून वस्तीपर्यंतचा रस्ता खड्डेमय असून, पावसात पूर्णतः खराब झाला आहे. अशा स्थितीत आजारी व्यक्ती आणि गरोदर महिलांची तातडीने वैद्यकीय मदत मिळणे जवळपास अशक्य झाल्याने नातेवाईकानी महिलेला प्रसुतीसाठी एक किलोमीटर बाजेवर आणल्याचा प्रकार आष्टी तालुक्यात समोर आला आहे. ग्रामीण भागात रस्त्यांचा अभाव आणि आरोग्यसेवांचा अपुरा पुरवठा ही आजही मोठी समस्या असून, संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. महिलेला कडा येथील एका खाजगी दवाखान्यात दाखल करण्यात आले.

गावातील सर्व वस्ती ठिकाणी तातडीने सर्वेक्षण करून रस्ते उपलब्ध करावेत, तसेच गरोदर महिलांसाठी तातडीची रुग्णसेवा पोहचवावी, त्यांनी प्रशासनाचे लक्ष या गंभीर समस्येकडे वेधले असून, लवकरात लवकर उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा येथील रहवाशी सामाजिक कार्यकत सावता ससाणे दिला आहे.

# धारूर आगारास पाच नविन बस आ. सोंळकेचे हस्ते पुजन करून शुभारंभ

धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर एसटी आगारास पाच नवीन एसटी बसेस प्राप्त झाल्या असून आ. प्रकाश दादा सोळुंके यांच्या पाठपुराव्यामुळे ह्या गाड्या प्राप्त झाल्याने त्यांच्या हस्ते पूजन करून या गाड्यांचा शुभारंभ रविवारी १ जुन रोजी करण्यात आला यावेळी विवीध शिष्टमंडळानी भेटून आ. सोंळके याऩा विवीध विकास कायाची निवेदन दिले.



धारूर आगार हे बीड जिल्ह्यामध्ये उत्पन्नात अग्रेसर असणारे एस टि आगार आहेत या आगारास मानव संसाधन विकासच्या विद्यार्थ्यांनी वाहतुकीसाठी चार नवीन बसेस मागील महिन्यात आल्या होत्या मात्र सर्वसामान्य प्रवासासाठी लागणाऱ्या लाल परी अद्याप आल्या नव्हत्या व जिल्ह्यात इतर सर्व आगारास या गाड्या येत होत्या याही आगारास या गाड्या मिळाव्यात यासाठी आ. प्रकाश दादा सोळंके यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. त्यांनी राज्य परिवहन मंत्राकडे पाठपुरावा करून या आगारास पाच बसेस मिळवून दिल्या या बसेसचा शुभारंभ रविवार दिनांक १ जून रोजी त्यांच्याहस्ते फित कापून व या गाड्याचे पूजन करून करण्यात आला यावेळी जिल्ह्याचे धारूर आगाराचे पालक अधिकारी मुंडे धारूरचे आगारप्रमुख नवनाथ चौरे येथील कर्मचारी राष्ट्रवादी कौंग्रेसचे तालूकाध्यक्ष अमोल जगताप न. प गटनेते सुधीर शिनगारे शहराध्यक्ष नितीन शिनगारे शेख फसियोद्दीन सचिन जाधव गणेश सावत गणेश जाधव ज्ञानेश्वर शिंदे अड मोहन भोसले सुरेश अंडील व शहरातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते व प्रवासीही यावेळी उपस्थित होते.

# बोकाळलेली अवैध सावकारी मोडीत काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांना भेटणार : माजी आ. भिमराव धोंडे

## तालुक्यातील अवैध सावकाराला कंटाळलेल्या लोकांनी आमच्याशी संपर्क साधावा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी/पाटोदा/शिरूर मतदारसंघात गेल्या अनेक वर्षापासून अवैध सावकारी बोकाळली असून या अवैध सावकारीने अनेकांचे जीव घेऊन, अनेकांचे कुटूंब उघड्यावर पाडले आहेत. तालुक्यातील अनेक लोक अवैध सावकारीला कंटाळून लोक गाव सोडून गेले आहेत. या सावकारीला आळा घालण्यासाठी आपण स्वतः एसपींना भेटलो असून, त्यांनी आठ दिवसात योग्य कारवाई केली नाही तर राज्याच्या मुख्यमंत्र्यांना भेटून ही अवैध सावकारकी मोडीत काढणार असल्याचे प्रतिपादन माजी आ. भिमराव धोंडे यांनी केले आहे.

आष्टी येथील भगवान महाविद्यालयात रविवार दि.०१/०५/२०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत माजी



आमदार भिमराव धोंडे बोलत होते. पुढे बोलतांना धोंडे म्हणाले, खाजगी सावकारकीने अनेकांचे संसार उद्धवस्त झाले आहेत. यात सावकारीला बळी पडलेले कुठलेही धन दांडगे लोक नसून फक्त आणि फक्त गरीबच लोक आहेत गरिबांनाच पैशाची गरज पडली की असे लोक त्याचा फायदा घेऊन गोरगरिबाचं जीन हराम करून टाकतात. दोन दिवसांपुर्वी पाटोदा शहरातील प्रसिद्ध व्यापारी संजय कांकरीया यांनी या खाजगी सावकाराला घेतलेल्या पैशाचे पाच पट पैसे दिले तरी अजूनही पैशांची मागणी केल्यामुळे या अवैध जुलमी सावकारीला कंटाळून आत्महत्या केली. पाटोदा शिरूर तालुक्यात तर अवैध सावकारी महिलांच्या टोळ्याच निर्माण केलेल्या आहेत. हे माजलेले सावकार वेळ प्रसंगी खाजगी सावकार बाईला सुध्दा अंगावर घालतात. खोटे गुन्हे दाखल करू अशा धमक्या दिल्या जातात. आशा या सावकारीला आळा घालावा जर या सावकारांचे पैसे देऊनही हे सावकार पैसे मागत असतील तर त्यांनी आपल्याशी संपर्क साधावा आंम्ही त्यांचा बंदोबस्त करतो असे मतदारसंघातील शेतकरी, कामगार व गोर गरीब जनतेला माजी आ. भिमरावजी धोंडे यांनी आवाहन केले आहे. आपण स्वतः जिल्ह्याचे एसपी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याना भेटून या मतदार संघातील अवैध सावकारी मोडीत काढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

# ठाकर आडगावात दिवसाढवळ्या चोरी

जातेगाव । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील जातेगावपासून जवळच असलेल्या ठाकर आडगाव येथील गोरख काशिनाथ कोकाट यांच्या घराचे कुलूप तोडून प्रवेश केलेल्या चोरट्यांनी चार तोळे सोन्याचे दागिने व रोख दीड लाख रुपये चोरून नेले. गुरुवारी दुपारी २ वाजता ही घटना घडली.

गोरख कोकाट हे घराला कुलूप



लावून शेतात गेले होते. या संधीचा फायदा घेत चोरट्यांनी डाव साधला. भरदिवसा झालेल्या या घटनेमुळे भाव परिसरात भीतीचे वातावरण आहे. जातेगाव हे सर्कलचे गाव असून अनेक गावांचा तसेच सात तांड्यांचा समावेश आहे. या भागातील गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलण्याची गरज आहे.

# खरीप पिक लागवडीमध्ये बीजप्रक्रिया महत्वाची : डॉ.हनुमान गरुड

जातेगाव । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र खामगाव, कृषी विभाग महाराष्ट्र शासन तसेच आत्मा आणि कोरोमंडल बीड यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय कृषिमंत्री भारत सरकार यांच्या संकल्पनेतून विकसित कृषी संकल्प अभियान २०२५ या मोहिमेला तिसऱ्या दिवशी सुध्दा प्रचंड प्रतिसाद शेतकऱ्याकडून



दिसून आला आहे.सदरील अभियान जातेगाव मंडळ मध्ये असलेल्या मौजे रोहितळ आणि ठाकर आडगाव या गावामधे घेण्यात आला.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणुन गावातील सरपंच यांची उपस्थीती होती. सदरील कार्यक्रमात खरीप हंगाम पूर्व नियोजन यासंदर्भात डॉ.रवींद्र चव्हाण शास्त्रज्ञ वनस्पती रोगशास्त्र, कृषी विज्ञान केंद्र खामगाव येथील कार्यक्रम समन्वयक डॉ.हनुमान गरुड, आयसीएआर चे डॉ.डी.हरीश आणि कोरोमंडळ चे जिल्हा प्रतिनिधी प्रा आखरे हे लाभले होते. यामध्ये प्रामुख्याने खरीप हंगामातील प्रमुख पिकांची लागवड तंत्रज्ञान व्यवस्थापन, पिकावरील एकात्मिक रोग व्यवस्थापन, बिज प्रक्रियेचे महत्व, हवामान बदला नुसार शेती, फुल शेती व्यवस्थापन याबद्दल सविस्तर असे सखोल मार्गदर्शन उपस्थित शेतकऱ्यांना अभियानादरम्यान करण्यात आले.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गजेंद्र आढावे तर आभार प्रदर्शन कृषीमित्र श्री.बाबू कोकाट यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी कृषी विज्ञान केंद्र, खामगाव आणि कृषी विभाग गेवराई येथील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# आनंदी आणि समाधानी जीवनासाठी शिक्षणासोबत नातेसंबंध जपा : बदामराव पंडित

गेवराई । प्रतिनिधी

प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये अलौकिक बुद्धिमत्ता आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहून आपल्या आयुष्याच्या ध्येयावर लक्ष केंद्रित केल्यास त्याला यशापासून कोणीही रोखू शकणार नाही. ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी गावातच मोफत शिक्षणाची सोय मी करू शकलो याचे मला समाधान वाटते. गेवराई शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड मेहनत घेण्याची जिद्द, हिम्मत आणि चिकाटी असल्याने विविध क्षेत्रातील यशस्वी होतात याचा अभिमान वाटतो. गुणवंत विद्यार्थ्यांच्या या यशामध्ये पालकांसोबत शिक्षकांचा मोठा वाटा आहे असे गौरोद्गार माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी व्यक्त करून कुटुंब आणि नातेगोते सांभाळा. कारण त्याशिवाय पुढील आयुष्य आनंद आणि समाधानाने जगता येत नाही असा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेच्या अध्यक्ष सौ गिरीकाभाभी पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था संचलित तालुक्यातील सर्व माध्यमिक शाळेतील शालांत परीक्षेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याचा अध्यक्ष समारोप करताना ते बोलत होते.



कार्यक्रमास नायब तहसीलदार मोरे, पोलीस उपनिरीक्षक जंजाळ, बीड जिल्हा परिषद माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजीत पंडित, माजी आरोग्य व शिक्षण सभापती पंढरीनाथ लगड, युवानेते रोहित पंडित, शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेच्या सचिव सौ अनुरूपाताई पंडित, युवानेते यशराज पंडित, बबलू खराडे, सरपंच संभाजी आहेर, सरपंच मुकुंद बाबर, शेख शहदाद, साद चाऊस, गोविंद जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी शालांत परीक्षा २०२५ मध्ये सीबीएससी बोर्डात छत्रपती संभाजी नगर येथील नाथ व्हॅली स्कूल मधून ९५ टक्के गुणाने सर्व द्वितीय ठरलेल्या राजवर्धन रोहित पंडित याच्यासह रानमळा, भोगलगाव, खांडवी, माटेगाव, रोहितळ, शेकटा या शाळांमधून प्रथम आलेल्या- निकम साक्षी सुनील, मडके पुजा ज्ञानेश्वर, शेजुळ रोहित ताराचंद, चव्हाण अजय दिगंबर, गायकवाड वैष्णवी अशोक, कांबळे गौरी दादाराव यांना प्रत्येकी २१०० रुपये रोख आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. त्यासोबतच द्वितीय - देवकुळे ज्ञानेश्वरी जगन, धुमाळ प्रकाश बापूराव, राठोड स्नेहल शिवाजी, सय्यद अनाम कबीर, बेलगुडे मुकेश विलास, शेंबडे ऋषिकेश संजय, महानोर रूपाली नारायण, तृतीय - मुळूक ऋतुजा दत्ता, गायकवाड भक्ती रामेश्वर, राठोड अश्विनी केशव, माळी नेता सतीश, कोकाट भाग्यश्री शहादेव, येळे वैष्णवी मच्छिंद्र यांच्यासह १२५ गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह आणि पुष्पहार देऊन पालकांसह सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक जंजाळ यांनी विद्यार्थ्यांनी आई वडील यांची कष्ट आणि मेहनत लक्षात ठेवून शिक्षण घ्यावे त्यासोबतच स्पर्धा परीक्षा देऊन प्रशासकीय सेवेत येण्यासाठी प्रोत्साहित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनकर शिंदे, प्रास्ताविक मुख्याध्यापक राजाभाऊ क्षीरसागर यांनी तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक दीपक गरुड यांनी केले.

या कार्यक्रमास चत्रभुज नाईकवाडे, चंद्रकांत शिंदे, बंडू घोलप, परमेश्वर शिंदे, चंद्रसेन जाधव, प्रशासकीय अधिकारी तथा मुख्याध्यापक प्रमोद देसले, मुख्याध्यापक अमोल राजापूरकर, मुख्याध्यापक केशव तळेकर, मुख्याध्यापक अविनाश पंडित यांच्यासह विद्यार्थी, पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT